महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर पुणे - ४११००५
Email id : mco@punecorporation.org
फोन क्र. ०२०- २५५०११००
जावक क्र. मआ/साप्रवि/२३९३
दिनांक : १३ /०७/२०२०

# सुधारीत आदेश

**विषय :- पुणे हद्दीत कोवीड-१९ चा प्रादुर्भाव कमी करणेकामी प्रतिबंधात्मक उपाययोजना**

**संदर्भ :-** १. भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७.
२. आपत्ती व्यवस्थापन अधिनयम २००५.
३. महाराष्ट्र कोविड उपाययोजना नियम २०२०.
४. महसूल व वन विभाग आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन विभाग आदेश क्र.डीएमयु/२०२०/प्र.क्र./९२/डी आयएसएम-१ दि.२९ जुन २०२०.
५. दि.१०/०७/२०२० रोजी विभागीय आयुक्त, कार्यालय पुणे झालेल्या बैठकीतील निर्देश.
६. या कार्यालयाचे आदेश क्र. जा.क्र.मआ/साप्रवि/२३६१ दि. १२/०७/२०२०

ज्याअर्थी राज्य शासनाने संदर्भ क्र. ४ अन्वये महापालिका आयुक्तांना साथ रोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन, संदर्भ क्र. ६ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तथापि आता मी, विक्रम कुमार, आयुक्त पुणे महानगरपालिका सदर आदेशामध्ये खालील प्रमाणे सुधारणा करणेत येत आहेत. संदर्भ क्र. ६ मधिल उर्वरीत तपशिलामध्ये कोणताही बदल नाही.

**२. तथापि, खालील अत्यावश्यक बाबी / सेवा मर्यादीत स्वरुपात व निर्बंधासह सुरु राहतील.**

| | |
|---|---|
| f. | पेट्रोलपंप व गॅसपंप सकाळी ९.०० ते सायं. ६.०० या वेळेत सुरु राहतील व ते केवळ शासकीय वाहने व अत्यावश्यक सेवेतील व पुरवठा साखळीतील वाहनास इंधन पुरवठा |

| | |
|---|---|
| | करतील. |
| l | सर्व राष्ट्रीयकृत व आरबीआयने मान्यता दिलेल्या बँका नियमानुसार किमान मनुष्यबळासह सुरु राहतील. बँकेच्या इतर ग्राहकसेवा जसे ऑनलाईन, एटीएम सेवा, विमा कंपन्या यांच्या सेवा सुरु राहतील. |
| p | सर्व औद्योगिक आस्थापना उक्त कालावधीत सुरू राहतील. सदर अस्थापना मधील कार्यरत अधिकारी / कामगार यांना संबधीत अस्थापनेच्या एच आर विभाग प्रमुख यांनी यासोबतच्या अनुसुची प्रमाणे वाहन परवाना कंपनीच्या लेटरहेड वर निर्गमित करावा. त्या करीता त्यांना प्राधिकृत करणेत येत आहे. कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती संबधीत पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशन प्रभारी यांना सादर करावी. कंपनी कामगार यांनी कामावर जाताना व परत येताना प्रवासा दरम्याने कंपनिचे ओळखपत्र व कंपनी कडुन पुरविण्यात आलेला वाहन परवाना सोबत ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. तथापी, ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून आल्यास असा कामगार / अधिकारी कार्यरत असलेल्या युनिट मधिल सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. दरम्यानच्या कालावधीत संबधित युनिट बंद ठेवण्यात यावे. चाचणी पुर्ण झाल्या नंतर व संबंधित युनिटचे निर्जंतुकीकरण पुर्ण झाल्या नंतरच ते परत कार्यान्वित करावे. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |
| r | माहिती तंत्रज्ञान विषयक काम करणारे व सेवा देणारे व्यवसाय, दूरसंचार क्षेत्र (Telecom Sector) १५% कर्मचारी क्षमतेसह सुरु ठेवता येतील. शक्य असल्यास work from home चा पर्याय वापरण्यात यावा. सदर अस्थापना मधिल कार्यरत अधिकारी / कामगार यांना संबधीत अस्थापनेच्या एच आर विभाग प्रमुख यांनी यासोबतच्या अनुसुची प्रमाणे वाहन परवाना कंपनीच्या लेटरहेड वर निर्गमित करावा. त्या करीता त्यांना प्राधिकृत करणेत येत आहे. कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती संबधीत पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशन प्रभारी यांना सादर करावी. कंपनी कामगार यांनी कामावर जाताना व परत येताना प्रवासा दरम्याने कंपनिचे ओळखपत्र व कंपनी कडुन पुरविण्यात आलेला वाहन परवाना सोबत ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. तथापी, ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून आल्यास असा कामगार / अधिकारी कार्यरत असलेल्या युनिट मधिल सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. |

| | |
|---|---|
| | दरम्यानच्या कालावधीत संबधित युनिट बंद ठेवण्यात यावे. चाचणी पुर्ण झाल्या नंतर व संबंधित युनिटचे निर्जंतुकीकरण पुर्ण झाल्या नंतरच ते परत कार्यान्वित करावे. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |
| t | शेतमालाशी कृषि निगडीत प्रक्रिया उद्योग नियमानुसार चालु राहतील. सदर अस्थापना मधिल कार्यरत अधिकारी / कामगार यांना संबधीत अस्थापनेच्या एच आर विभाग प्रमुख यांनी यासोबतच्या अनुसुची प्रमाणे वाहन परवाना कंपनीच्या लेटरहेड वर निर्गमित करावा. त्या करीता त्यांना प्राधिकृत करणेत येत आहे. कंपनी कडुन निर्गमित करणेत आलेल्या परवान्यांची माहीती संबधीत पोलिस आयुक्त व पोलिस स्टेशन प्रभारी यांना सादर करावी. कंपनी कामगार यांनी कामावर जाताना व परत येताना प्रवासा दरम्याने कंपनिचे ओळखपत्र व कंपनी कडुन पुरविण्यात आलेला वाहन परवाना सोबत ठेवणे बंधनकारक करण्यात येत आहे. तथापी, ज्या औद्योगिक आस्थापनामध्ये कोवीड-१९ चा रूग्ण आढळून आल्यास असा कामगार / अधिकारी कार्यरत असलेल्या युनिट मधिल सर्व कामगारांची कोवीड-१९ ची तपासणी स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील. दरम्यानच्या कालावधीत संबधित युनिट बंद ठेवण्यात यावे. चाचणी पुर्ण झाल्या नंतर व संबंधित युनिटचे निर्जंतुकीकरण पुर्ण झाल्या नंतरच ते परत कार्यान्वित करावे. प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील व्यक्तीसच फक्त कामावर उपस्थित राहता येईल. |
| u | सर्व वैद्यकीय व्यावसायीक, परिचारीका, पॅरामेडिकल कर्मचारी, सफाई कर्मचारी व अँम्बुलन्स यांना शहराअंतर्गत वाहतूकीसाठी परवानगी राहिल. त्यासाठी वेगळा पास अथवा परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. |

सदरचा आदेश हा माझ्या सही व शिक्क्यानिशी आज दिनांक १३/०७/२०२० रोजी दिलेला आहे.

ठिकाण -: पुणे
दिनांक -: १३/०७/२०२०

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF POONA * EST.1950 * पुणे म्युनिसिपल कॉर्पोरेशन सन-१९५०

( विक्रम कुमार )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका, पुणे

प्रत माहितीस्तव सादर -:

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे

३. मा.पोलीस आयुक्त, पुणे पोलिस आयुक्तालय

४. मा.जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे

५. मा.प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे

६. सर्व पोलीस स्टेशन पुणे शहर

७. तहसिलदार हवेली

८. जिल्हा माहिती अधिकारी, पुणे

प्रत कार्यवाहीस्तव -:

१. सर्व विभाग प्रमुख, पुणे महानगरपालिका

२. सर्व क्षेत्रिय अधिकारी, पुणे महानगरपालिका यांनी सदरील आदेश मेगाफोनद्वारे सर्व नागरिकांना अवगत करावेत.

३. जनसंपर्क अधिकारी यांनी आदेशास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.